# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोल दिनांक ०१/०७/२०१८

## नागरीकांनी अफवांवर विश्वास ठेवु नये

गेली अनेक दिवसांपासुन देशातील आसाम,तेलंगणा सह आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये विविध भागात लहान मुलांना पळवुन नेणा-या टोळ्या गावात आल्या आहेत. अशी अफवा वॉटस् अपवरुन पसरवुन गावात येणा-या नवीन व्यक्ती, वाटसरुं, वेडसर लोकांना त्याचबरोबर आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना सादर करुन गावोगावी फिरुन आपल्या पोटाची खळगी भरणा-या कलाकारांना पकडुन जमावाने अमानुषपणे मारहाण करण्याचे प्रकार घडले आहेत. अशा प्रकारच्या घटनांमध्ये मारहाण केल्यामुळे यात निष्पाप लोकांचा मृत्यु ओढवल्याच्या घटना देखील घडल्या आहेत.

यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील सर्व नागरीकांना पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली यांच्यातर्फे आवाहान करण्यात येते की, नागरिकांनी अशा प्रकारच्या अफवा पसरवु नयेत व अशा अफवांवर अजिबात विश्वास ठेवु नये. अशा प्रकारची कोणतीही टोळी गडचिरोली मध्ये सक्रिय नसुन असा कोणताही प्रकार किंवा घटना जिल्ह्यात घडलेली नाही. आपल्या गावात येणा-या अनोळखी ईसमाबाबत आपल्या मनात काही संशय असल्यास कायदा हातात न घेता आपण आपल्या जवळच्या पोलीस स्टेशनशी किंवा नियंत्रण कक्षाशी ०७१३२-२२३१४२,०७१३२-२२२१६३ संपर्क साधावा. अशा प्रकारे कायदा हातात घेवुन मारहाण करणा-यांवर कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. मारहाणीत मृत्यु झाल्यास संपुर्ण जमावावर कलम ३०२ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करुन अटक करण्यात येईल.

‘
“